स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

राष्ट्रीय सेवा योजना NATIONAL SERVICE SCHEME

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६—२७/२८०  दि. ०९/१०/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
फक्त पुणे जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय: विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ दावे व हरकतीच्या कालावधीमध्ये जनजागृती आणि प्रत्यक्ष मतदार नोंदणी मोहीम राबविण्याबाबत...

संदर्भ: १.रासेयो/२०२६—२७/२६०, दि.२४/०९/२०२६ रोजीचे पत्र
२. मा. उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, पुणे यांचे क्र.उपजिभूसं/ १७/ निवडणूक—१/कावि/२६/२०२६, दि.३०/०९/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये मा. भारत निवडणूक आयोगाच्या पत्रान्वये विशेष सखोल पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच प्रारूप मतदार याद्यांच्या अनुषंगाने दावे व हरकती दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट ते १२ ऑक्टोबर २०२६ असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. या टप्याचे शेवटचे काही दिवस शिल्लक असून या कालावधीमध्ये मतदारयादित नवमतदार तसेच स्थंलातरीत मतदारांचा समावेश होण्याकरिता विशेष प्रयत्न अपेक्षित आहेत.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयातील निवडणूक साक्षरता मंचांमार्फत(ELC) नवमतदारांनी मतदार यादित नाव नोदंविण्याच्या ऑनलाईन/ऑफलाईन अर्ज भरून घेण्याकरिता विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, व मतदार नोंदणीबाबत मतदारांमध्ये जनजागृती करावी.

त्यानुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये सोबतच्या मा. उपजिल्हाधिकारी तथा स्वीप नोडल अधिकारी, पुणे यांच्या पत्राचे अवलोकन करून सदर उपक्रम यशस्वी करण्याकरिता आपल्यास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. अधिक माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबतच्या पत्राचे अवलोकन करावे. कळावे, ही विनंती.

तसेच वेळोवेळी घेणेत आलेली शिबिरे यांचे फोटो व आकडेवारी जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना कळविण्यात यावी. तसेच याबाबतची माहिती BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"मतदार याद्यांचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम(SIR)-2026"** या विषयाची निवड करून सादर करणे अनिवार्य आहे. **अहवाल सादर करताना 'संक्षिप्त अहवाल/अभिप्राय/टिपणी/प्रतिक्रीया' याठिकाणी सदर उपक्रमाकरिता सहभागी विद्यार्थ्यांची माहिती घ्यावी.** कळावे, ही विनंती.

Bhame.

संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

सोबत : वरिल संदर्भीय पत्र

# उपजिल्हाधिकारी (भूसंपादन ) क्र.१७,पुणे यांचे कार्यालय

## जिल्हाधिकारी कार्यालय, दुसरा मजला, बी. विंग ,पुणे

E Mail ID- sloa17pune@gmail.com


क्र.उपजिभूसं/१७ /निवडणूक-1/कावि/२६/२०२६ दि. ३०/०९/२०२६

प्रति,

१.मा. कुलसचिव
सावित्रीबाई फुले विद्यापिठ पुणे

२.भारती विद्यापिठ , पुणे

३.यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ , पुणे

४.एम. आय. टी. पुणे

५.डी. वाय. पाटील, पुणे

विषय:- विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम -२०२६ मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत..

संदर्भ:-१) मा. भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र. २३/२०२५-ERS (Vol.II) दिनांक १४/०५/२०२६

२) मा. भारत निवडणुक आयोग यांचेकडील पत्र क्र. २३/२०२६-ERS (Vol.II) दिनांक १९/०८/२०२६

३) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र ईएलआर २०२६/प्र.क्र १०६/नि-६ दिनांक ०९/०९/२०२६.

४) मा. मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचे कडील पत्र क्र- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/नि-६ दि.२९.०९.२०२६

उपरोक्त विषयाबाबत वरील संदर्भिय पत्राचे अवलोकन करण्यात यावे संदर्भ क्र. ४ च्या अन्वये मा. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार, विशेष सखोल पुनरिक्षणाच्या प्रारुप मतदार यादीमध्ये अनेक मतदारांची नावे गैरहजर/स्थलांतरित किंवा अन्य कारणांमुळे मतदार यादीमध्ये समाविष्ट होऊ शकली नाहीत. गैरहजर/स्थलांतरित किंवा इतर कारणामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट करु न शकलेल्या मतदारांना त्यांच्या सध्याच्या सर्वसाधारण रहिवासाच्या ठिकाणांहून मतदार यादीमध्ये नव्याने नाव अंतर्भूत करण्यास दावे व हरकतीच्या कालावधीमध्ये संधी उपलब्ध झालेली आहे. त्याच प्रमाणे ऑक्टोबर २०२४ नंतर मतदार यादी पुनरिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात आला नसल्याने दि.०१.१०.२०२४ नंतर १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदविता आले नव्हते. आता, दि.०१.१०.२०२६ रोजी किंवा त्या पूर्वी १८ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व नवमतदारांना मतदार यादीमध्ये नाव अंतर्भूत करण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे, याची नोंद घेण्यात यावी.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत मतदार नोंदणी करीता दिनांक १९, २०, २६ व २७ सप्टेंबर,२०२६ या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्याबाबत दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात आली होती.

मा. भारत निवडणूक आयोगाच्या दि. २६.०९.२०२६ च्या पत्रान्वये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहिर केलेले आहेत. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दिनांक ३१.०८.२०२६ ते १२.१०.२०२६ अशी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सबब, नवमतदार तसेच अन्यथा पात्र असून प्रारुप मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट न झालेल्या नागरिकांना मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करणे, मतदार यादीमधील अस्तित्वात असलेल्या नोंदीमध्ये सुधारणा करणे तसेच यादीतील नावाची वगळणी करणे या करिता मा. निवडणूक आयोगाने विशेष सखोल पुनरिक्षणाच्या दावे व हरकती कालावधीत दिनांक ३,४,१० व ११ ऑक्टोबर, २०२६ या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिरे आयोजित करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत.

त्यानुसार विशेष शिबिरे आयोजित करताना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी त्यांना नेमून दिलेल्या मतदार यादी भागासाठीच्या केंद्रांवर दिनांक ३, ४,१० व ११ ऑक्टोबर, २०२६ या दिवशी सकाळ १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत उपस्थित राहणार आहेत.

२) सदर शिबिरांमध्ये मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याबरोबर मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधी हे देखील उपस्थित राहणार आहेत.

३) या शिबिरांमध्ये मतदान केंद्रांवर मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून नागरीकांचे मतदार नोंदणी, दुरुस्ती वा वगळणीचे अर्ज भरुन घेण्यात येतील.

४) मतदार नोंदणी अधिकारी व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांनी काही विशेष शिबिरांना भेटी देऊन तेथील कागकाजाचे पर्यवेक्षण व मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

५)सदर विशेष शिबिरांमध्ये महिला तसेच दिव्यांगांच्या समावेशनासाठी विशेष प्राधान्य देण्यात यावे.

६)प्रारूप यादीतील मतदारांची संख्या तसेच दिनांक ०१.०६.२०२६ रोजीची (Projected populations) विचारात घेऊन त्यामधील फरकानुसार जास्तीत जास्त करावी आणि पात्र मतदार हे यादीत नाव नोंदविण्यापासून वंचित राहणार नाही यासाठी विशेष प्रयत्न करावे.

याव्यतिरिक्त दिनांक ०१.१०.२०२६ या अहर्ताकारी दिनांकानुसार ज्या नागरिकांना 18 वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि त्यांची मतदार म्हणून नाव नोंदणी होऊ शकलेली नाही अशा युवकांची संख्या मोठी राहणार असल्याने, त्यांच्याकरिता सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत आपल्या विधानसभा मतदार संघातील सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे व अशा नव युवा नागरिकांची नावे जास्तीत जास्तपणे मतदार म्हणून नोंदविता येतील यासाठी विशेष प्रयत्न करण्यात यावेत व याबाबतचा केलेला अहवाल व घेणेत आलेली शिबिरे यांचे फोटो व आकडेवारी या कार्यालयाकडून स्प्रेडशिट पाठविली जाईल त्यामध्ये भरुन घेणेची दक्षता घेणेत यावी.

Digitally signed by AMITA RAHUL TALEKAR DHUMAL Date: 01.10.2026 02:53:37

उपजिल्हाधिकारी तथा
स्वीप नोडल अधिकारी ,पुणे

प्रत:- 1.मा. मुख्य निवडणूक अधिकारी , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांजकडे माहितीस्तव सविनय सादर.

2.मा.विभागीय आयुक्त , पुणे विभाग पुणे ( सामान्य प्रशासन विभाग ) यांजकडे सविनय सादर.

3.उपजिल्हा निवडणूक अधिकारी , पुणे यांचेकडे माहितीसाठी.

# मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

क्रमांक- ईएलआर २०२६/प्र.क्र.१०६/निवडणूक-६
सामान्य प्रशासन विभाग
मादाम कामा रोड हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २९ सप्टेंबर, २०२६.

प्रति,
१) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
२) सचिव, मराठी भाषा विभाग तथा मतदार यादी निरीक्षक, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
३) विभागीय आयुक्त तथा मतदार यादी निरीक्षक, कोकण विभाग (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).
४) सर्व अतिरीक्त जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर.
५) सर्व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून).

विषय: विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम-२०२६
मतदार नोंदणी करीता विशेष शिबिरे आयोजित करणेबाबत.

संदर्भ : १) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- २३/२०२५-ERS (Vol-II), दिनांक १४.०५.२०२६.
२) या कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दि.०४.०९.२०२६ व ०९.०९.२०२६.
३) भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक- २३/२०२५-ERS (Vol-II), दिनांक २६.०९.२०२६.

महोदय/महोदया,

भारत निवडणूक आयोगाने दिनांक २६.०९.२०२६ च्या पत्रान्वये विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाचे सुधारित वेळापत्रक जाहिर केलेले आहे. त्यानुसार दावे व हरकती सादर करण्यासाठी दिनांक ३१.०८.२०२६ ते १२.१०.२०२६ अशी मुदतवाढ दिलेली असून, अंतिम मतदार यादी दिनांक १६.११.२०२६ रोजी प्रसिध्द करावयाची आहे.

२. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या अंतर्गत मतदार नोंदणी करीता दिनांक १९, २०, २६ व २७ सप्टेंबर, २०२६ या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्याबाबत दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये आपणांस कळविण्यात आले होते. त्यानुसार संपूर्ण राज्यामध्ये सर्व मतदान केंद्रावर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात आली होती. आता, भारत निवडणूक आयोगाने दावे व हरकती सादर करण्याकरीता देण्यात आलेली दिनांक १२.१०.२०२६ ची मुतदवाढ विचारात घेवून, जास्तीत जास्त नागरीकांना/ नव मतदारांना आपली नावे मतदार यादी मध्ये नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने दिनांक ३, ४, १० व ११ ऑक्टोबर, २०२६ या दिवशी सर्व मतदान केंद्रांवर विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात यावीत.

३. दिनांक ०९.०९.२०२६ च्या पत्रान्वये यासंदर्भात देण्यात आलेल्या सर्व सूचना उपरोक्त दिवशी आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष नोंदणी शिबीराकरीता लागू राहतील. याबाबतचा नियमित अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा, ही विनंती.

आपला,

(मनोहर पारकर)
सह सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य.